**नियमित दिवाणी कब्जा क्र. १४३/२०१८ मधील नि.क्र. ४९ वरील आदेश**

( पारीत दिनांक – १०/०३/२०२५)

हौसाबाई महिपती चौगले वि. गणपती दिनकर वाडकर.

०१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

०२. वादीच्या कथनानुसार, मयत हौसाबाई महिपती चौगले या मयत झालेनंतर निशाणी क्र. ४७ वर वादीचे वारस रेकॉर्डवर घेणेबाबतचा अर्ज मंजूर केलेला आहे. मयत वादीचे वारस मुलगी सौ. वस्तला बळवंत परिते हिने सदरकामी वादी म्हणून समाविष्ट होणेस नकार दिलेला आहे. सदर वस्तला बळवंत परिते ही मयत वादी हौसाबाई चौगले यांची कायदेशीर सरळ वारस असल्याने तिला वारस म्हणून रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. तसेच ती याकामी आवश्यक पक्षकार असल्याने तिला याकामी वादी ऐवजी प्रतिवादी क्र. १० म्हणून तिच्या नावाचा समावेश करुन तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळण्याबाबत सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल करण्यात आला आहे.

०३. सदरील अर्जावर म्हणणे देण्यासाठी प्रतिवादी यांना वारंवार पुरेशी संधी देवूनही त्यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नसल्याने सदरचा अर्ज प्रतिवादींचे म्हणणे विना चालविण्यात आला. प्रस्तुत अर्जात नमुद प्रस्तावित प्रतिवादी क्र. १० वस्तला बळवंत परिते यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. ५४ वर दाखल केले असून अर्ज नामंजूर करून त्या मयत वादी हौसाबाई महिपती चौगले यांचे वारस म्हणून प्रस्तुत दावेकामी त्यांना हजर राहून म्हणणे देणेचा हक्क व अधिकार असल्याचे कथन केले. सदर प्रस्तावित प्रतिवादी क्र. १० यांनी त्या मयत हौसाबाई महिपती चौगले यांच्या कायदेशीर वारस म्हणून कैफियत व म्हणणे रेकॉर्डवर घेण्यात येण्याची विनंती केली.

०४. वादी व प्रस्तावित प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

०५. प्रस्तुत प्रकरणी दावा हा वाटपाकरीता, तुटक कब्जा व मनाईकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये मयत वादी हौसाबाई चौगले

हिची वारस मुलगी सौ. वस्तला बळवंत परिते हिचे नाव प्रतिवादी क्र. १० म्हणून समावेश करणेस व तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मागितली आहे. अर्जातील नमुद कारणांचा विचार करता तसेच दुरुस्तीच्या स्वरुपाचा विचार करता वस्तला बळवंत परिते या मयत वादी यांची मुलगी असल्याने तसेच प्रस्तुत दावेकामी आवश्यक पक्षकार असल्याने सदरची दुरुस्ती मंजूर करणे योग्य राहील असे वाटते. तसेच प्रस्तावित प्रतिवादी यांनी देखील त्या मयत वादीचे वारस असल्याचे मान्य करुन त्यांना हजर होवून कैफियत व म्हणणे देणेचा हक्क व अधिकार असल्याचे त्यांचे म्हणणे (नि.५४) मध्ये नमुद केलेले आहे. उपरोक्त नमुद कारणमिमांसेचा विचार करता, सदरची दुरुस्ती मंजूर करण्यात आल्याने दाव्याचे स्वरुप बदलेल असे निश्चितच वाटत नाही. सबब, सदरचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

**– आ दे श –**

१) अर्ज (निशाणी क्र.४९) वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रु. २००/– खर्च (cost) स्वरुपात देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२) वादीनी मंजूर दुरुस्ती अर्जाप्रमाणे प्रस्तावित दुरुस्ती त्वरित करुन घ्यावी.

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2025.03.10 17:32:09 +0900

कागल. **(प्रणिता एस.पाटील)**

दिनांक – १०/०३/२०२५ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.